संकेतस्थळ :- www.mahatranscom.in
ई-मेल :- dycommr.enf1@gmail.com
फोनक्र :- ०२२-२६५५०९३२/३३
फॅक्सक्र :- ०२२-२६४१४९०१
क्र.पआका/म.रा./का.१(५)/रा.प.प्रा./बैठक-२५७/२०१६/जा.क्र. 15628
**परिवहन आयुक्तकार्यालय,**
प्रशासकीयइमारत,३ रा व ४था मजला,
सरकारी वसाहत, वांद्रे (पूर्व) मुंबई ४०००५१
दिनांक :- 26 SEP 2016

प्रति,
परिवहन उप आयुक्त (संगणक),
परिवहन आयुक्त कार्यालय,
महाराष्ट्र राज्य

**विषय:-** महाराष्ट्र-आंध्रप्रदेश राज्यांमध्ये झालेल्या परस्पर वाहतुक करारांतर्गत शिल्लक फेऱ्यांची माहिती विभागाच्या वेबसाईटवर प्रदर्शित करणेबाबत

महाराष्ट्र व आंध्रप्रदेश या राज्यांमध्ये दि. ३०.११.१९७७ रोजी झालेल्या परस्पर वाहतुक कराराचा परिच्छेद II (A) च्या तरतुदीनुसार कंत्राटी वाहनांना एकूण पाच परवाने मंजूर करण्याची तरतुद आहे.

राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांनी त्यांच्या दिनांक ३१.०५.२०१६ रोजीच्या बैठकित ठराव क्र. ०१/२०१६ अन्वये पुढील पाच वर्षाकरीता श्री. पद्मनभा वि. शेट्टी व श्री. शेखर टी. शेट्टी यांना एक-एक कंत्राटी परवाना मंजूर करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच, शिल्लक फे-यांची माहिती विभागाच्या वेबसाईटवर प्रदर्शित करण्याचे निर्देश दिले आहेत.

राज्य परिवहन प्राधिकरणाच्या उपरोक्त प्रमाणे घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी खालील प्रमाणे माहिती मोटार वाहन विभागाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात यावी.

"महाराष्ट्र व आंध्रप्रदेश या राज्यांमध्ये दि. ३०.११.१९७७ रोजी झालेल्या परस्पर वाहतुक कराराचा परिच्छेद II (A) च्या तरतुदीनुसार कंत्राटी वाहनांना एकूण पाच परवाने मंजूर करण्याची तरतुद असून राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांच्या दिनांक ३१.०५.२०१६ रोजीच्या बैठकित मुंबई-हैद्राबाद या मार्गासाठी श्री. पद्मनभा वि. शेट्टी व श्री. शेखर टी. शेट्टी यांना एक-एक परवाना मंजूर करण्यात आला असून तीन परवाने शिल्लक आहेत."

(महेश देवकाते)
**सहाय्यक परिवहन आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

ज 15628
प्र 1H
सह
पा 26 SEP 2016